# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
Website : www.unipune.ac.in

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune - 411007
Phone: 2025621398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा / 3547 दिनांक : 6 नोव्हेंबर, २०२३

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा)

**विषय :** सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी (हिवाळी सत्र २०२३ व उन्हाळी सत्र २०२४) परीक्षेस बसण्यासाठी संधी देणेबाबत...

महोदय / महोदया,

वरील विषयाबाबत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २६५ / २०२३, दिनांक ०१ / ११ / २०२३ निर्गमित करण्यात आले आहे. या निर्णयानुसार खाली नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी परीक्षेस बसण्यास संधी देण्यात आली आहे.

१. अंतिम वर्ष अनुत्तीर्ण असलेले, परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी.

२. अंतिमपूर्व वर्षातील अनुत्तीर्ण असलेले परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम वर्षात अनुशेष (बॅकलॉग) आहे, तसेच ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम पूर्व वर्षात अनुशेष (बॅकलॉग) आहे की ज्यांची सोडवणूक निश्चित केलेल्या विहित कालावधीमध्ये पूर्ण होईल असे सर्व विद्यार्थी.

३. मौखिक, प्रात्यक्षिक, प्रोजेक्ट, डेझरटेशन इ. व अशा इतर अनुषंगिक परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण असणारे परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी.

४. वर नमूद केलेल्या क्र. १ व २ मध्ये अंतर्भूत न होणारे विद्यार्थी उरल्यास अशा विद्यार्थ्यांनी विशेष बाब म्हणून संधी मिळण्यासाठी संबंधित महाविद्यालयाकडे अर्ज करावेत. असे एक वर्ष संधीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मा. प्राचार्य यांनी प्रचलित अनुषंगिक अध्यादेश, विविध केंद्रिय व राज्यस्तरीय प्राधिकरणाचे निकष, परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक मार्गदर्शक तत्वे व अटी या सर्वांबाबतची खातरजमा करून सदर पात्र विद्यार्थ्यांच्या विनंतीबाबत स्पष्ट अभिप्रायासह असे अर्ज परीक्षा विभागाकडे सादर करावेत.

सदर विशेष सवलत दिलेल्या विद्यार्थ्यांना नियमित परीक्षांमध्ये सामावून घेणे शक्य असल्यास ते समकक्ष विषयांनुसार परीक्षा देतील, अन्यथा अशा विद्यार्थ्यांची परीक्षा स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येईल. वरील क्र. १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या धोरणानुसार

पात्र विद्यार्थ्यांना दोन परीक्षांची विशेष संधी मिळाल्यानंतरच्या काळात यापैकी कोणत्याही विद्यार्थ्यांस व अशा इतर विद्यार्थ्यांना भविष्यकाळात संधी दिली जाणार नाही.

सदर पत्राचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा व कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची योग्य ती दक्षता घेवून कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला,

(डॉ. महेश काकडे)

**संचालक**

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**